# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक ११३ वा ❑ भारतीय सौर दिनांक २२ ज्येष्ठ शके १९४८, शुक्रवार दि.१२ जून २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## प्रशासकीय भ्रष्टाचार: व्यवस्थेला लागलेली कीड

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

प्रशासनातील वाढता भ्रष्टाचार ही लोकशाही आणि देशाच्या विकासासाठी अत्यंत चिंताजनक बाब आहे. यामुळे शासकीय योजनांचा लाभ तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचत नाही आणि सामान्य नागरिकांचा व्यवस्थेवरील विश्वास उडतो.

प्रशासकीय भ्रष्टाचार म्हणजे सत्तेचा आणि पदाचा वैयक्तिक लाभासाठी केलेला गैरवापर. ही एक अशी कीड आहे जी केवळ शासकीय तिजोरीलाच पोखरत नाही, तर सामान्य नागरिकांच्या मूलभूत हक्कांची पायमल्ली करून लोकशाही व्यवस्थेवरील त्यांचा विश्वास उडवून टाकते.

अलीकडे लाच घेऊन काम करण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे.

राज्यातील लाचखोर अधिकाऱ्यांना वठणीवर आणण्याचं काम सध्या एसीबीकडून () सुरू असून गेल्या काही महिन्यात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने छापेमारी करत लाखचोरांना रंगेहात अटक केली. विशेष म्हणजे एसीबीने आज एकाच दिवशी दोन ठिकाणी धाड टाकत आधी पोलीस () अंमलदारास १० हजारांची लाच घेताना रंगेहात अटक केली. तर, दुसऱ्या धाडीत थेट तहसीलदारालाच बेड्या ठोकल्या आहे. अंबडचे तहसीलदार विजय चव्हाण यांना एका प्रकरणात ६ लाख ४० हजार रुपयांची लाच स्वीकारताना बीड एसीबीने रंगेहात अटक केली. तत्पूर्वी, जालना एसीबीने बीडमधील नेकनूर येथे जाऊन पोलीस अंमलदारास लाच घेताना अटक केली. या दोन्ही कारवायांमुळे जिल्हा प्रशासनात खळबळ उडाली आहे.

सरकारी कार्यालयांमध्ये कागदपत्रे आणि परवानग्या मिळवण्याची प्रक्रिया अत्यंत क्लिष्ट असते, ज्यामुळे सामान्य नागरिक लाच देऊन काम लवकर करून घेण्यास प्राधान्य देतात. अधिकाऱ्यांच्या अफाट अधिकारांमुळे आणि मनमानी कारभारामुळे पारदर्शकता कमी होते.

अनेक ठिकाणी चांगल्या पदावर जाण्यासाठी आर्थिक व्यवहार होतात, ज्यामुळे ते पद मिळवल्यानंतर अधिकारी पुन्हा ती रक्कम वसूल करण्याचा प्रयत्न करतात.

भ्रष्ट अधिकारी रंगेहाथ पकडले गेल्यावरही कायदेशीर प्रक्रिया अत्यंत संथ चालते आणि दोषींना कडक शिक्षा होण्याचे प्रमाण नगण्य असते.

अलीकडे लाच घेऊन काम करणाऱ्यांचे

भ्रष्टाचार ही एक मानसिक आणि प्रणालीगत समस्या आहे ती नष्ट करण्यासाठी केवळ कायद्याची कडक अंमलबजावणी नव्हे, तर व्यवस्थेत नैतिक मूल्यांची रुजवणूक करणे अत्यंत गरजेचे आहे.लहान वयातच विद्यार्थ्यांमध्ये सचोटी, पारदर्शकता आणि सामाजिक जबाबदारी यांसारख्या मूल्यांची रुजवणूक करण्यासाठी शालेय स्तरावर नैतिक शिक्षण देणे आवश्यक आहे. कुटुंबातील वातावरणामध्ये प्रामाणिकपणाला प्रोत्साहन दिल्यास भावी पिढी भ्रष्टाचारापासून दूर राहू शकते.

सरकारी कामकाजात आणि निर्णयांमध्ये डिजिटल साधनांचा वापर वाढवून मानवी हस्तक्षेपाचे प्रमाण कमी करणे आवश्यक झाले आहे. भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी प्रशासकीय अधिकाऱ्यांची आणि कर्मचाऱ्यांची उत्तरदायित्व निश्चित करणे.त्याच बरोबर कायद्याची कडक अंमलबजावणी करणे, भ्रष्टाचाराच्या खटल्यांचा जलद गतीने निकाल लावून गुन्हेगारांना कठोर शिक्षा मिळणे आवश्यक आहे.

भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदे केंद्रीय दक्षता आयोग आणि इतर तपास यंत्रणांचे सक्षमीकरण करून कायद्याची कठोर अंमलबजावणी करणे, नागरिकांनी आपल्या हक्कांप्रमाणेच कर्तव्यांची जाणीव ठेवून भ्रष्टाचाराविरुद्ध आवाज उठवणे,माहिती अधिकाराचा प्रभावी वापर करून शासकीय कारभारात पारदर्शकता आणणे. या गोष्टी केल्याने भ्रष्टाचाराला आळा बसू शकतो.थोडक्यात सांगायचे तर, बाह्य व्यवस्थेतील बदलांसोबतच व्यक्तीच्या आंतरिक जाणिवा जागृत झाल्याशिवाय भ्रष्टाचारमुक्त समाजाची निर्मिती अशक्य आहे.






# संगीत नाटक अकादमीचे प्रतिष्ठित पुरस्कार जाहीर

## अशोक पत्की, आनंद भाटे, अरुण नलावडे यांच्यासह महाराष्ट्रातील दिग्गज व युवा कलावंतांचा राष्ट्रीय गौरव



**ज्योतिर्मय साहित्य**

नवी दिल्ली – भारतीय संगीत, नृत्य, नाट्य आणि लोककलांच्या जतन व संवर्धनासाठी देशातील सर्वोच्च मानल्या जाणाऱ्या 'संगीत नाटक अकादमी'च्या वतीने वर्ष २०२४ आणि २०२५ साठीचे प्रतिष्ठित 'संगीत नाटक अकादमी फेलोशिप', 'संगीत नाटक अकादमी पुरस्कार' तसेच 'उस्ताद बिस्मिल्ला खाँ युवा पुरस्कार' जाहीर करण्यात आले आहेत. या पुरस्कारांमध्ये महाराष्ट्रातील अनेक ज्येष्ठ, दिग्गज तसेच युवा कलावंतांनी राष्ट्रीय स्तरावर सन्मान मिळवत राज्याच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेचा गौरव वाढविला आहे.

यंदाच्या पुरस्कारांमध्ये महाराष्ट्रातील संगीत, नाट्य, नृत्य, लोककला आणि पारंपरिक कला क्षेत्रातील अनेक मान्यवर कलावंतांचा गौरव करण्यात आला आहे. ज्येष्ठ कलावंतांसोबतच युवा कलाकारांनाही राष्ट्रीय स्तरावर सन्मान मिळाल्याने महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाला नवी ओळख मिळाली आहे.

**वर्ष २०२४ मधील महाराष्ट्राचे पुरस्कार मानकरी**

वर्ष २०२४ साठी जाहीर करण्यात आलेल्या संगीत नाटक अकादमी पुरस्कारांमध्ये हिंदुस्तानी शास्त्रीय गायन क्षेत्रातील ज्येष्ठ गायक अरुण कशाळकर आणि अभंग गायनासाठी प्रसिद्ध गायक आनंद भाटे यांचा समावेश आहे. अभिनय क्षेत्रातील योगदानासाठी अभिनेते अरुण नलावडे, पारंपरिक रंगभूमी क्षेत्रासाठी मुकुंद मराठे, लोकनृत्य क्षेत्रासाठी सुभाष नारायण नकाशे तसेच नृत्य क्षेत्रातील संशोधन आणि अभ्यासपूर्ण योगदानासाठी शुभदा वरदकर यांची निवड करण्यात आली आहे.'उस्ताद बिस्मिल्ला खाँ युवा पुरस्कारां'मध्ये हिंदुस्तानी गायनासाठी कृष्ण बोंगाणे आणि अंकिता जोशी, भारूड या लोकसंगीत प्रकारासाठी भावार्थ रामचंद्र देखणे, बाहुलीनाट्य या दुर्मिळ लोककलेसाठी बाळकृष्ण गणपत मसगे आणि लोकनृत्य व लोकसंगीतासाठी चेतन वामन खेडेकर यांची निवड झाली आहे.

**वर्ष २०२५ मधील महाराष्ट्राचे पुरस्कार मानकरी**

वर्ष २०२५ साठीच्या संगीत नाटक अकादमी पुरस्कारांमध्ये शहनाई वादनासाठी शैलेश भागवत, दिग्दर्शन क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी प्रमोद डी. पवार, नाट्यसंगीत क्षेत्रातील दीर्घकालीन योगदानासाठी ज्येष्ठ संगीतकार अशोक पत्की तसेच कथक नृत्य क्षेत्रातील विशेष कार्यासाठी मनीषा साठे यांना पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. तसेच 'उस्ताद बिस्मिल्ला खाँ युवा पुरस्कारां'मध्ये हार्मोनियम वादनातील प्रभुत्वासाठी तन्मय देवचके आणि महाराष्ट्राच्या लोकपरंपरेतील जागर या लोकसंगीत प्रकारासाठी प्रवीण प्रताप जाधव यांची निवड करण्यात आली आहे.

या पुरस्कारांचे स्वरूप अत्यंत प्रतिष्ठेचे असून, अकादमी पुरस्काराचे स्वरूप १,००,००० रुपये, ताम्रपट आणि शाल असे आहे, तर युवा कलाकारांना प्रोत्साहन देण्यासाठी उस्ताद बिस्मिल्ला खाँ युवा पुरस्कारांतर्गत २५,००० रुपये, ताम्रपट आणि शाल देऊन सन्मानित केले जाते. हे पुरस्कार राष्ट्रपतींच्या उपस्थितीत आयोजित विशेष समारंभात प्रदान करण्यात येणार असल्याचे अकादमीतर्फे कळविण्यात आले आहे.

# बालमजुरी ही समाजातील एक अनिष्ठ प्रथा

**ज्योतिर्मय साहित्य**

तुकाराम महाराज म्हणतात, ''लहानपण देगा देवा, मुंगी साखरेचा रवा''. आयुष्याच्या पुस्तकातील सर्वात सुंदर पान म्हणजे बालपण, लहान मुलं म्हणजे देवाघरची फुलं. लहान मुलं पाहिली की इवलासा जीव, निरागसता, उमलत्या फुलासारखे गोंडस छोटेसे रूप आपल्या डोळ्यासमोर उभे राहते. पण हाच निरागसपना किवा ही उमलती नाजूक फुले आज कोणत्या ना कोणत्या ठिकाणी काम करताना आपल्याला दिसतात. घरची बेताची परिस्थिती असल्यामुळे कदाचित त्या लहान मुलांचे आई-वडील त्यांना कामाच्या ठिकाणी नेत असतात. आपल्यासोबत तो ही कामाला लागला की तेवढेच चार पैसे जास्तीचे येतील म्हणून लहान मुलांचा निरागसपणा बाजूला सारत त्या नाजूक हातांमध्ये काम दिले जाते.




बालमजुरीमुळे बालकांच्या मानसिकतेवर वाईट परिणाम होतो तसेच आरोग्याच्या समस्या निर्माण होतात. बालमजुरी रोखून बालकांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देणे व त्यांना पुढे नेणेः हाच विचार बालमजुरी रोखण्यासाठी उत्तमोत्तम एकमेव मार्ग होय. आज आपण बऱ्याच ठिकाणी बघतो की मोठ मोठ्या कंपन्या, किराणा दुकान, कापड दुकान, हॉटेल, फुटवेअर शॉप इत्यादी ठिकाणी ही निरागस मुले काम करतात. एकीकडे आपणच म्हणतो की, बालपण देगा देवा आणि दुसरीकडे आपणच त्या नाजूक हातांना कामाला लावतो. एकीकडे आपण म्हणतो की, आजचे लहान मूल उद्याचे उज्वल भविष्य आहे.

मग उद्याचे उज्वल भविष्य घडविण्याची ही कोणती पद्धत? जर अशीच पद्धत चालू राहीली तर उद्याचे उज्वल भविष्य कदाचित उज्वल राहणार नाही. कुठल्याही योजना काही दिवसापुरत्याच मर्यादित असतात किंवा काही दिवसच चालतात. परत जशास तसे परिस्थिती समोर येते. खरे तर बालमजुरी ही समाजातील एक अनिष्ठ प्रथा आहे आणि ही अनिष्ट प्रथा बंद करण्यासाठी सरकार आपली कार्यक्षम व सक्षम भूमिका पार पाडत आहे. दरवर्षी १२ जून हा दिवस जागतिक बाल कामगार विरोधी दिन म्हणून मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. आणि या दिवशी समाजातील प्रत्येक व्यक्तीपर्यंत हा संदेश जागतिक बाल कामगार विरोधी दिनी पोहोचवला जातो. की, बालमजुरी करून घेणे हा कायद्यान्वये गुन्हा आहे.

बालकामगार प्रतिबंध आणि नियमन अधिनियमानुसार या कायद्याचे उल्लंघन केल्यास किंवा वय वर्ष १४ ते १८ या वयोगटातील बालकांकडून काम करून घेणाऱ्या मालकास किवा त्या त्या व्यक्तीस दंड होऊ शकतो, शिक्षा होऊ शकते. या नियमानुसार किशोरवयीन बालकांना धोकादायक व्यवसायाच्या ठिकाणी कामावर ठेवणे हा गुन्हा आहे. आपल्या घरची बेताची परिस्थिती आहे असे म्हणत आपल्या सोबत अगदीच लहान मुले यांना देखील कामाच्या ठिकाणी नेले जाते. कोवळ्या म्हणजे अगदीच बालपण जगणाऱ्या, साऊन खेळण्याच्या बालपण जगण्याच्या वयात बालपणाला बाजूला सारत नाजूक हातात अर्थार्जनाची जबाबदारी दिली जाते.


हे कितपत योग्य आहे? हा केवळ एक प्रश्न नसून समाजासाठी एक घातक समस्या आहे किशोरवयीन

बालकांच्या छोट्या खांद्यावर अर्थार्जनाच्या जबाबदारीची कास हाती धरायला सांगितली जाते. खरे तर बालकांच्या या समस्यांकडे किंवा प्रश्नाकडे केवळ कायद्यातील तरतूद किवा त्या अंमलात आणणाऱ्या उपाययोजनांपुरते मर्यादित असे म्हणत न बघता उद्याचे उज्वल भविष्य म्हणून पाहावे. व बालमजुरीच्या निर्मूलनासाठी समाजातील प्रत्येक व्यक्तीने लहान व किशोरवयीन बालकांकडे बालकामगार या दृष्टीने न बघता स्वतःच्या विचारात बदल करावा, व बालमजूर समाजातील ही अनिष्ट प्रथा कायम बंद करावी, यावर कायमचा रोख लावावा.










## जात्यावरच्या ओव्या......

आल भरून आभाळ
माझा खुश झाला बंधू
हळदकुंकू, नारळान
तिफन, मोडग्याला वंदू ||६८७||

आल भरून आभाळ
सुटल वारंवावधान
रानावनात ल्या बाळा
तुला करत सावधान|| ६८८||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

## मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक–भाग ३९




विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२

ज्योतिर्मय साहित्य

संत तुकाराम महाराज म्हणतात, ''ठेविले अनंते तैसेची राहावे, चित्ती असू द्यावे समाधान.'' हे आपल्याला कळते पण वळत नाही आणि आपला सुखाचा आणि समाधानाचा शोध सुरूच राहतो. प्रत्येक परिस्थितीत आपली सुखाची आणि समाधानाची व्याख्या बदलत जाते. मला नोकरी लागली म्हणजे मी सुखी होईल, माझ्या पगारात वाढ झाली म्हणजे मी सुखी होईल, माझ्याकडे आज जी चारचाकी आहे, उद्या त्यापेक्षा आणखी चांगल्या प्रकारचे वाहन आले म्हणजे मला समाधान लाभेल. आणखी जमीन, आणखी घरे, बंगले यासारख्या गोष्टी माणूस मिळवण्यासाठी माणूस धडपड करतो आणि त्यासाठी आयुष्यभर धाव धाव धावतो. परंतु त्याची हाव संपत नाही. कुठे थांबायचे हे त्याला कळत नाही.



एका शेतकऱ्याची गोष्ट फार सुंदर आहे. तो आपल्या शेताच्या बांधावर आरामात झोपला होता. त्याची एका मोक्याच्या ठिकाणी शेतजमीन होती. शहरातून आलेला एक कारखानदार ती जमीन विकत घेऊन तिथे कारखाना काढण्याच्या तयारीत होता. तो त्या शेतकऱ्याला म्हणाला ,''तू मला ही जमीन दिलीस तर मी तुला भरपूर पैसे देईन. तू श्रीमंत होशील.'' शेतकऱ्यांनी विचारले,''भरपूर पैसे मिळाल्यावर आणि श्रीमंत झाल्यावर काय होईल ?'' जमीनदार म्हणाला,''वेडा आहेस का ?अरे, तू अत्यंत समाधानात राहशील.'' शेतकरी म्हणायला,''मग त्यासाठी जमीन विकायची काय गरज आहे ? मी आत्ता देखील समाधानीच आहे.'' एका सामान्य शेतकऱ्याला जी गोष्ट कळली ती आपल्याला कळत नाही.

परमेश्वर प्राप्तीच्या आड जर काही येत असेल तर ते म्हणजे आपले मन ! आपले मन अतिशय चंचल आहे आणि ही गोष्ट सगळ्यांनाच माहिती आहे. म्हणून तर एका गाण्यात म्हटले आहे, '' माझिया मना जरा जरा थांब ना, तुझे धावणे अन् मला वेदना !'' म्हणून समर्थ म्हणतात की आपले हे चांचल्य म्हणजे चंचलता भगवंताला अर्पण करून आपली चित्त त्याच्याकडे केंद्रित करावे. त्याचे ध्यान लागावे.


गीतेत भगवंत म्हणतात ''सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज'' सर्वधर्म म्हणजे आपली सुखदुःखे, कर्म, वासना आदी सगळे भगवंताला अर्पण करून त्याला शरण जावे. तो आनंदनिधान आहे. अक्षय सुख आणि समाधान त्याच्याच ठायी आहे.

स्वसंवाद : १) मी ज्या सुखाच्या शोधात धावत आहे, ते खरोखरच मला समाधान देणारे आहे का? की ही केवळ अंतहीन धावपळ आहे?

२) माझ्या मनातील चंचलता, अपेक्षा आणि असंतोष मी कधी परमेश्वराला अर्पण करण्याचा प्रयत्न केला आहे का?

३) ''समाधान'' ही बाह्य गोष्टींमध्ये नसून अंतर्मनात आहे हे मला खरेच पटले आहे का?

(क्रमशः)




## || संजय उवाच... ||




@संजय काव्या पुणे 7743918559

✍️ आनंद

आनंद हा आपल्या सुखाचा एक भाग आहे तो केंव्हा, कधी, कसा मिळेल हे पूर्णपणे आपल्यावर अवलंबून असते, त्यासाठी पैशाची, अनुभवाची किंवा कुठल्या कसोटीची आवश्यकता नसते. आनंद वाटल्याने वाढतो. सदैव आनंदी रहावे हे निरोगी माणसाचे लक्षण आहे.

## निरासक्ति आणि शरणागति



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

एखाद्याची सुरी असली, तिची लाकडी मूठ बदलून लोखंडाची केली; दुसऱ्याने चांदीची केली, कुणी सोन्याची केली; पण मारल्यानंतर परिणाम एकच ! तसा, प्रपंच चांगला असला, कसाही असला, तरी तो सुरीच आहे, त्याचा घात सगळीकडे सारखाच ! प्रपंचाची आसक्ती म्हणजे त्या सुरीची धार आहे. म्हणून, आपला धंदा, नोकरी, सगळे उत्तम करावे, त्यात मागेपुढे पाहू नये; पण त्यासाठी मी आहे असे नाही समजू कधी. नोकरी ही सुखाकरिता नसून पोट भरण्यासाठी आहे अशा वृत्तीने जो ती करील त्याला तिची आसक्ती आणि अभिमान राहणार नाही. सावधगिरीने वागावे, भगवंताचे स्मरण ठेवावे, त्याचे नाम घ्यावे; बाकीच्या सगळ्या गोष्टी प्रारब्धावर ठेवाव्या. यानेच समाधान मिळेल. भगवंताशिवाय समाधान मिळणे शक्य नाही. ' मी समाधान राखून चाललो ' असे म्हणणारा तो जगात धन्य आहे खरा ! ही धन्यता यायला भगवंताची अत्यंत आवश्यकता आहे. रामाच्या इच्छेने सर्व चालले आहे, राम कर्ता आहे ही भावना ठेवून आपण प्रपंच करू या. प्रयत्न आटोकाट करावा, पण फळ देणारा भगवंत आहे ही भावना ठेवून समाधान टिकवावे.

भगवंताची प्राप्ती व्हायला दुसरे काही नको, शरणागती पाहिजे. मी उपाधिरहित बनणे ही शरणागती आहे. माझेपणाची जी उपाधी आहे ती नाहीशी करायची असेल तर साधन तसेच पाहिजे. इतके उपाधिरहित साधन नामाशिवाय दुसरे कोणतेही नाही. ते साधन तुम्ही करा. भगवंताच्या नामाचे प्रेम यायचे असेल तर अंतःकरण शुद्ध पाहिजे; अंतःकरण द्वेषाने, मत्सराने, अभिमानाने भरलेले असू नये. एकमेकांवर प्रेम करा, घरातून सुरुवात करा. मुलगा आपल्याला सुख देतो म्हणून नाही, पण माझे कर्तव्य म्हणून मी त्याच्यावर प्रेम करीन. निःस्वार्थीपणाने प्रेम करणे हाच परमार्थ आहे खरा. त्यासाठी, राम दाता आहे, पाठीराखा भगवंत आहे, ही जाणीव ठेवून तुम्ही रहा. ही जाणीव निर्माण करण्याकरिता भगवंताच्या नामाची खरी गरज आहे. मनाची शांती मिळवायला हाच मार्ग आहे. दैन्यवाणे कधीच नसावे. अगदी राजाचे वैभव तुम्ही भोगा, पण त्या वैभवाने मी सुखी आहे असे न म्हणता, मी रामाचा आहे म्हणून सुखी आहे ही भावना ठेवून वागा. वैभव आज आहे, उद्या नाही; वैभवावर विश्वास ठेवू नका. मी रामाचा आहे या भावनेत तुम्ही रहा. त्यासाठी रामाचे नाम तुम्ही घ्या, राम कल्याण करील हा माझा भरवसा तुम्ही ठेवा.

सुख कशात आहे ? सुख हे समजुतीमध्ये आहे, आणि भगवंताचे होणे ही समजूत तेवढीच खरी आहे.

***

## || अध्यात्म ||

मधुकर बोरीकर,
पुणे



जगद्गुरु संत तुकाराम महाराज

ज्या क्षणी संत साधु आपल्या घरी येतील तोच दिवाळी दसरा. कारण सत्वगुणात त्यांच्या सानिध्यामुळे वृद्धी होते. भक्ती चा मोहोर फुलतो व आनंदाचे उधान येते. हेच तुकाराम महाराजही सांगतात.

नित्य हरिकथा नित्य नामावळी/
वैष्णवांचे कुळी धन्य जन्म/
म्हणून पंढरी उपजवावे संसारी/
प्रत्यक्ष श्रीहरी तिरी उभा//
नित्यता दिवाळी /नाही तेथे द्वैत//
नित्यता अच्युत तिष्ठतसे/
निवृत्ती सादर विष्णुमय सार/
विठ्ठल आचार पंढरीये//

## सुख दुःखाचे तरंग माणसा-माणसाचे



✍️वसंत कुलकर्णी,
छ.संभाजीनगर,
मो. 96730 67194

### "दृष्टीकोणाचे मोजमाप"

खर तर कधी कधी वाटते सुखदुःख हे काही नसून तो आपल्या मनाचा खेळ आहे. कारण आपल्या दृष्टीकोनावर सर्व काही निर्भर आहे. जसा विचार दृष्टीकोण तसे होते,? तशा भावभावना बनतात !

करणी तशी भरणी याचा अर्थ तुम्ही पेराल तसे उगवेल! म्हणून जीवनात डिप्रेशन एकटेपणा येण्यापेक्षा एकान्त चांगला. या दोन्हीत सूक्ष्म फरक आहे. एकटेपणा म्हणजे आपण करून घेतलेली समजूत, दृष्टीकोण. एकटेपणा निराशा तणावाचे कारण तर एकान्त ही मनाला सुखावणारी गोष्ट. अलिप्तता असावी. तुमच्याकडे संसाधने असो नसो, ती कमी किंवा जास्त असो, तुमचा दृष्टीकोन महत्त्वाचा. लोकाबद्दल व्यवस्थेबद्दल, नातलग समाजाबद्दल आपला हेतू महत्वाचा. परिस्थिती व घटनेकडे कसे पाहतो हे महत्वाचे. संत विचारवंत योगी लोक एकान्त ठिकाणाला प्राधान्य देत कारण तेथे ते भक्तीच्या विचारांच्या खोलीत मग्न असत. योग लेखन, ध्यान जाप भगवान व निसर्गाशी एकरूप होत. हे ज्याने त्याने आपापल्या कुवतीप्रमाणे करणे हे सरावाने येते. हे संत लोक नेहमी करतात कारण त्यांनी आपले ईतीकार्य व दृष्टीकोन ठरविला आहे. त्याना घरदार संसारमुले पैसा सोने नाणे यात स्वारस्य नाही. त्यांना त्याबद्दल काहीच वाटतं नाही त्यामुळे तरंगाचा प्रश्नच नाही ! देवासमोर ऊभे राहून तुम्ही काय सांगता हे, तुम्ही देवाकडे पाठ असतांना कसे वागता, हे खरे. मन बुद्धी द्वारे तुम्ही दृष्टीकोन विकसित करता व नेहमी सकारात्मक राहून आनंदी निरोगी राहू शकतो. म्हणून येणार्या दिवसाचे हर्षाने स्वागत करा. गूड़ डे व्हेरी गूड़ मार्निंग आणि ईथे थांबतो. तुम्ही वाचत राहा सुख दुःखाचे तरंग माणसा-माणसाचे.




## उकळतं दूध व तुळस

ज्योतिर्मय साहित्य

तुळशीची पाने आणि तुळशीचे बी औषधी असल्याने अनेक आजारांवरील घरगुती उपायांमध्ये यांचा वापर लाभकारी ठरतो. गेल्या अनेक पिढ्यांपासून चालत आलेले हे घरगुती उपाय आरोग्याच्या दृष्टीने फायद्याचे आहेतच, शिवाय त्यांचे कोणते दुष्परिणाम देखील नाहीत. तुळशीची पाने औषधी असून, अनेक विकारांवर गुणकारी आहेत. सर्दी पडसे असो, किंवा डोकेदुखी असो, तुळशीच्या पानांचा काढा या सर्वच किरकोळ व्याधींवर गुणकारी आहे. तुळशीची पाने दुधामध्ये उकळून या दुधाचे सेवन केल्याने देखील अनेक व्याधींमध्ये गुण येतो. तुळशीची चार पाच पाने दुध उकळत असताना त्यामध्ये टाकावीत आणि दुध थोडेसे थंड झाल्यावर त्याचे सेवन करावे. या दुधाचे सेवन सकाळी उठल्यानंतर रिकाम्या पोटी करावे.

जर किडनी स्टोन्स झाल्याचे निदान, योग्य वेळी, व्याधी बळावण्यापूर्वीच झाले तर तुळस घातलेल्या दुधाचे सेवन रिकाम्या पोटी केल्याने गुण येतो. या दुधाने किडनी स्टोन विरघळण्यास मदत होते. ज्यांना हृदयरोग आहे, किंवा एखादा हृदयविकाराचा झटका येऊन गेला आहे, त्यांच्यासाठी देखील तुळस घातलेल्या दुधाचे सेवन लाभकारी आहे. हृदयरोगासाठी या दुधाचे सेवन फायदा करणारे आहे.

ज्यांना दम्याचा विकार असेल, किंवा ऋतुमान बदलल्याने, किंवा एखाद्या ॲलर्जीमुळे श्वसनाशी संबंधित तक्रारी उद्भविल्या असतील, त्यांचासाठी देखील तुळस घालून उकळलेल्या दुधाचे सेवन विशेष लाभकारी आहे. त्यामुळे ऋतुमान बदलत असताना श्वसना संबंधी समस्या उद्भविण्याची वाट न पाहता या दुधाचे सेवन नियमित करावे. तुळस अँटी बायोटिक असल्याने अनेक तऱ्हेच्या संसर्गांपासून शरीराचा बचाव करण्यास सक्षम असते.

अनेकदा हवामान बदलत असताना व्हायरल फ्लूची साथ येते. सर्दी, खोकला, ताप यांचा संसर्ग वाढतो. अश्या वेळी तुळस घातलेल्या दुधाचे सेवन या व्याधींना प्रतिरोध करून शरीर निरोगी ठेवण्यास सहायक आहे. तसेच ज्यांना डोकेदुखी किंवा मायग्रेनचा त्रास असेल, त्यांच्यासाठी देखील हे दुध विशेष लाभकारी आहे. अश्या व्यक्तींनी सकाळी चहा, कॉफी घेण्यापूर्वी तुळस घालून उकळलेल्या दुधाचे सेवन करावे. त्यामुळे मायग्रेनसारख्या समस्यांमध्ये विशेष लाभ मिळतो.

***

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी–चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

## प्रभातपुष्प

षटकोळी माझी

संध्याराणी जयहिंद कोल्हे {काव्यसंध्या}
कळंब जि.धाराशिव मो. 87885 91371

### वृक्षारोपण

आज पर्यावरण दिनानिमित्ताने
मिळूनी सर्वजण करु
वृक्षारोपण सर्वत्र छान
काळजी घेवू त्यांची
फुले,फळे यांसवे
प्राणवायू देती महान

झाडे लावून त्यांची
काळजी छान घेता
सुखाची सावली देतात
पाने, फुले, फळे
सर्वच उपयोगांसह ती
सावलीत वाटसरू बसतात


# माय बापांनो थांबवा हे प्रदर्शन!



**ज्योतिर्मय साहित्य**

दोन दिवस आधी माझी मैत्रीण माझ्या घरी आली. तिच्या मनातील घालमेल तिच्या डोळ्यातून जाणवत होती. चेहऱ्यावर असंख्य प्रश्नार्थक चिन्हे स्पष्ट दिसत होते. मी तिला बोलतं केलं.... ती म्हणाली... ''मुलगी-जावई येणार आहेत, अधिक महिना संपत आलाय ना.. असा विहीनबाईचा फोन आलाय.... मी एकटीने आता काय करायचं? ह्यांचं आजारपण, शिलाई काम करून मी सध्या आमचं निभावीत आहे.... शिवाय मुलीच्या लग्नाचं कर्ज डोक्यावर बसलेलं... आणि आता हे नवीनच जावयाला बोलावून त्यांचे सोहळे करायचं....'' मी शांत तिचं ऐकत होते...

दिखावा करणाऱ्या माय-बाप हो..... विचार करा, अशी साधी (गरीब) परिस्थिती कित्येक माय बापांची आहे... घरात दोनपेक्षा अधिक लेकरांची शिक्षणाची जबाबदारी असते. कुठे एकटा बाबा कमावतो, कुठे अवघे कुटुंब ती एकटी सांभाळते, कुठे दोघांची नेटकी कमाईवर घर चालतं. अशा साधारण परिस्थितीच्या माय-बापाने नवीन वस्त्र- चांदी, सोने कसे खरेदी करायचे? ऐपत नसतांना कसा धोंड्याचा सोहळा साजरा करायचा? आणि कोणत्याही मुलींच्या सासूबाईने, स्वतः मुलीने तिच्या माहेरची चालू परिस्थिती उमजून तरी विचार करावा.. कोणत्या पूराण कथेत हा रिवाज (सोहळा) वाचलाय? जावई एक लेक म्हणूनच असावा. अगदी वेळेनुसार सासरच्यांना सांभाळणारा...(स्वतःचे नाटकी सोहळे करून घेणारा नकोच). आणि बायकोला दुसऱ्यांचे अधिक महिन्याचे नाटकी सोहळे दाखवणारा तर नकोच नको. कोणत्याही संस्कारी घरातील आई -बाबा आपली मुलगी अनोळखी घरात, अनोळखी व्यक्तीच्या हातात देतांना अर्थातच त्या घराण्याबद्दल माहिती काढून फार मोठ्या विश्वासाने (काळजावर दगड ठेऊन) रीती-रिवाज सांभाळून समाजाच्या साक्षीने पवित्र विवाहबंधनात बांधून देत असते. मुलींसाठी परिस्थितीप्रमाणे जितकं दान देता येईल तितकं सारं तिला विवाहसोहळ्यात दिल्या जाते. कारण मुलगी आई -बाबांचा श्वास असतो. मुलीला संस्कारात योग्य घडवतांना, तिच्या शैक्षणिक जबाबदाऱ्या सांभाळतांना आई -बाबा दक्षतेने तिची काळजी घेत असतात. मुलींच्या लग्नानंतरचे ठरलेले सासरचे सोहळे, जावयाच्या प्रति सन्मान आदर आई, बाबा परंपरेने नीट सांभाळीत असतातच. मात्र हा धोंड्याचा महिना जर नवीनच रूप धारण करून अवतरत असेल तर साधारण परिस्थितीत




जगणाऱ्या आई -बाबांसाठी हे नवीन नाटक फार धक्कादायक आहे.. अहो माय बापांनो हे जावई पूजन नक्की करा पण घरातच करा. तुमच्या या दिखाव्याच्या रीलमुळे साधारण परिस्थितीत जगणारे आई -बाबा फार मोठ्या चिंतेत आहे हो. आमच्या आई-बाबांनी पण कित्येक वर्षाधी हा सोहळा रीत म्हणून केला. परिस्थितीप्रमाणे त्यांनी आम्हाला भरपूर दिले. आज तो जुना सौख्याचा सोहळा आठवतोय आणि आजचा हा अधिक महिन्याचा नाटकी सोहळा नजरेला भार वाटतोय.. .इन्स्टा, फेसबुक, स्टेट्स सर्व या दिखाव्याच्या सोहळ्याने गजबजलेले दिसत आहे. महागड्या फुलांचे डेकोरेशन, विविध अलंकार, जावयाला सुवर्ण दान, चांदीचे ताट, गडवा-ग्लास देतांना श्रीमंत सासूबाई, विविध डिझाईन्स प्लेट्समधील पदार्थ, दिव्यांची आरास.... जावयाचे गेटपासून तर देव्हाऱ्यापर्यंत थाटात केलेले स्वागत, सासूबाईने जावयांचे पाय धुतांनाचे नको ते व्हिडीओ... कधी कधी तर या सोहळ्याचे डेकोरेशन बघून हसायला येतं. हा सोहळा नव्हे... निव्वळ रील साठी केलेला दिखावा आहे. हे स्पष्ट चित्र दिसतं.....




# विरंगुळा केंद्राबात ज्येष्ठ नागरिकांचे नगरसेविका अनिता काटे यांना निवेदन

**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे - परिसरातील ज्येष्ठ नागरिक माझ्यासाठी नेहमीच मार्गदर्शक आहेत. त्यांचे हित जपण्यासाठी तसेच त्यांच्या अडचणी सोडविणे हे माझे प्रथम कर्तव्य असून त्यांना विरंगुळा केंद्र मिळवून देण्यासाठी मी प्राधान्य देईन असे आश्वासन नगरसेविका अनिता काटे यांनी दिले. स्मार्ट सिटी अंतर्गत विकसित होत असलेल्या पिंपळे सौदागर प्रभागात ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र उभारणी बाबत येथील ऑल सिनियर सिटीझन असोसिएशनच्या वतीने प्रभागाच्या नगरसेविका अनिता काटे यांना निवेदन देण्यात आले. त्यावेळी त्या बोलत होत्या. पिंपळे सौदागर परिसरात सद्यस्थितीत सहा ज्येष्ठ नागरिक संघटना कार्यरत असून महिला - पुरुष मिळून दिड हजारांपेक्षा जास्त सदस्यसंख्या आहे. या सर्व संघटना '' पिंपरी चिंचवड ज्येष्ठ नागरिक महासंघाशी '' संलग्न असून महानगरपालिकेच्या वतीने या संघटनांना दरवर्षी विविध स्वरूपात भेटवस्तू मिळतात. परंतु विरंगुळा केंद्र नसल्याने त्या ठेवायच्या कुठे हा प्रश्न संघटनांच्या पदाधिकाऱ्यांपुढे आहे. मनपाने दिलेल्या भेटवस्तू सुरक्षित ठेवण्यासाठी तसेच ज्येष्ठ नागरिकांना उतारवयात एकत्र येऊन सुख दुःखाच्या चार गोष्टी करण्यासाठी विरंगुळा केंद्र उपलब्ध करुन देण्यात यावे तसेच परिसरातील सांस्कृतिक चळवळ वाढीस लागण्यासाठी नाट्यगृहाची उभारणी करण्यात यावी अशी मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. ऑल सिनियर सिटीझन असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. सुभाषचंद्र पवार तसेच विवेकानंद लिगाडे, अशोक येळंमकर, सुभाष विधाते, रमेश चांडगे, सुभाष पाटील, अशोक कलाल, निर्मला कासार, भामिनी महाले, रमेश वाणी या पदाधिकाऱ्यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होते

# भावलेले शनी स्तोत्र...



**ज्योतिर्मय साहित्य**

स्तोत्र, मंत्र हे केवळ शब्द किंवा शब्द समूह नसून विशेष असतात. त्यांची पार्श्वभूमी जाणली तर ते विशेष फलदायी ठरतात

''मन्त्रे तीर्थे द्विजे देवे दैवज्ञे भेषजे गुरौ ।
यादृशी भावना यस्य सिद्धिर्भवति तादृशी ।।''

या प्रमाणे जशी भावना तसे फळ निश्चित प्राप्त होते.

दशरथकृत शनि स्तोत्र

नम: कृष्णाय नीलाय शितिकण्ठनिभाय च।
नम: कालाग्निरूपाय कृतान्ताय च वै नम: ।।
नमो निर्मांस देहाय दीर्घश्मश्रुजटाय च।
नमो विशालनेत्राय शुष्कोदर भयाकृते।।
नम: पुष्कलगात्राय स्थूलरोम्णेऽथ वै नम:।
नमो दीर्घायशुष्काय कालदष्ट्र नमोऽस्तुते।।
नमस्ते कोटराक्षाय दुर्निरीक्ष्याय वै नम:।
नमो घोराय रौद्राय भीषणाय कपालिने।।
नमस्ते सर्वभक्षाय वलीमुखायनमोऽस्तुते।
सूर्यपुत्र नमस्तेऽस्तु भास्करे भयदाय च।।
अधोदृष्टे: नमस्तेऽस्तु संवर्तक नमोऽस्तुते।
नमो मन्दगते तुभ्यं निरिस्त्रणाय नमोऽस्तुते।।
तपसा दग्धदेहाय नित्यं योगरताय च।
नमो नित्यं क्षुधार्ताय अतृप्ताय च वै नम:।।
ज्ञानचक्षुर्नमस्तेऽस्तु कश्यपात्मज सूनवे।
तुष्टो ददासि वै राज्यं रुष्टो हरसि तत्क्षणात्।।
देवासुरमनुष्याश्च सिद्धविद्याधरोरगा:।
त्वया विलोकिता: सर्वे नाशंयान्ति समूलत:।।
प्रसाद कुरु मे देव वाराहोऽहमुपागत।
एवं स्तुतस्तद सौरिग्रहराजो महाबल:।।

परमेश्वराचे पिता असून मरण समयी '' राम राम'' करतच प्राण सोडणारे दशरथ यांचं हे शनि स्तोत्र काही वेगळीच किमया करणार नाही का?




१. नियती आणि कर्मचक्राचे श्रेष्ठत्व

राजा दशरथ हे साक्षात देवाचे पिता होते, पण तरीही त्यांना प्रारब्ध आणि नियती चुकली नाही. शनी देव हे कर्मफळदाते आणि न्यायाचे प्रतीक मानले जातात. दशरथांनी शनीची स्तोत्राद्वारे स्तुती करणे हे दाखवून देते की, या जगात जन्माला आलेल्या प्रत्येक जीवालामग तो कितीही मोठा राजा किंवा भगवंताचा पिता असला तरीहीआपल्या कर्माच्या आणि ग्रहांच्या प्रभावातून जावेच लागते.

२. शनी देवांच्या संकटातून राज्याची सुटका (रोहिणी शकट भेदन)

पौराणिक कथेनुसार, जेव्हा शनी देव रोहिणी नक्षत्राचा वेध घेणार होते (ज्याला रोहिणी शकट भेदन म्हणतात), तेव्हा पृथ्वीवर १२ वर्षे तीव्र दुष्काळ पडणार होता. राजा दशरथ आपल्या प्रजेचे रक्षण करण्यासाठी थेट शनी देवांसमोर युद्ध करायला उभे राहिले. दशरथांचे हे धाडस आणि प्रजेबद्दलचे प्रेम पाहून शनी देव प्रसन्न झाले. **(क्रमश:)**



# रहाटणी येथील नम्रता क्रिस्टल पार्क सोसायटी मध्ये संस्कारवर्ग भूमी पूजन आणि वही पूजन कार्यक्रम संपन्न

**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे(प्रतिनिधी) नम्रता क्रिस्टल पार्क सोसायटी मध्ये स्वामी विवेकानंद केंद्र,कन्याकुमारी शाखा रहाटणी, येथे संस्कार वर्ग आणि वही पूजन कार्यक्रम, स्वामी विवेकानंद केंद्रात गेल्या वीस वर्षांपासून जीवनवृती कार्यकर्ता म्हणून कार्यरत असलेले श्री सुमित शिवहारे ग्वाल्हेर, (महाराष्ट्र आणि गोवा प्रांताचे सहसंघटक) यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला,

यावेळी ज्येष्ठ सदस्य प्रा.डी.एस. कुलकर्णी यांच्या शुभ हस्ते भारत माता आणि स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले त्यानंतर श्री सुमित शिवहारे, प्रा.डी.एस. कुलकर्णी, शाखेच्या प्रमुख, भारतीताई निर्मळ, श्री भालेकर यांच्या हस्ते संस्कार वर्ग भूमी पूजन आणि वही पूजन करण्यात आले, आपण बालकांना उत्तम शिक्षण देतो छान कपडे घेतो, त्याच बरोबर त्यांना लहान वयातच चांगले संस्कार सुद्धा दिले पाहिजेत भारतीय संस्कृतीची ओळख, देशभक्ती, माझा देश, माझी मातृभूमी, माझी माता पिता गुरु, याविषयी सुद्धा आदर प्रेम भावना ऋण निर्देश असे संस्कार देणे आवश्यक आहे त्यांच्या मनात, आत्मविश्वास, शिस्त, परस्परांविषयी आदराची भावना असे संस्कार या बाल वयातच देणे गरजेचे आहे.हे महत्वाचे कार्य अशा केंद्रामध्ये केले जाते.

म्हणून पालकांनी आपल्या पाल्यांना अशा संस्कार वर्गात अवश्य प्रवेश द्यावा असे आवाहन प्रा.डी.एस. कुलकर्णी यांनी आपल्या भाषणातून केले, याचवेळी त्यांनी श्री स्वामी विवेकानंद यांच्या जीवनातील महत्वपूर्ण कथा सांगून बालकांच्या मनात नवीन ऊर्जा उत्साह निर्माण केला,भारतभर भारती ताई निर्मळ सारखे असंख्य कार्यकर्ते संस्कार वर्गाचे कार्य विनामूल्य, विनाशुल्क करीत आहेत. यासाठी पालकांनी सहकार्य करावे, या शाखेचे प्रथम कार्य करणारे श्री अविनाश त्रिवेदी आणि सध्या कार्यरत असलेल्या भारतीताई निर्मळ यांचे खास अभिनंदन केले, या शाखेचे संस्कार वर्गाचे पाचवे वर्ष आहे म्हणून सर्व पालक मंडळी यांनी टाळ्या वाजवून त्यांचे अभिनंदन केले, यावेळी श्री सुमित शिवहारे यांनी बालकांचे विविध खेळ घेऊन आणि श्री स्वामी विवेकानंद, श्री छत्रपती शिवाजी महाराज, राणा प्रताप, यांच्या जीवनातील प्रेरक कथा सांगितल्या शेवटी शाखेच्या प्रमुख भारती ताई निर्मळ यांनी सर्वांचे आभार मानले. खाऊ वाटप झाल्यानंतर कार्यक्रम संपला, यावेळी नम्रता क्रिस्टल पार्क मधील ज्येष्ठ सदस्य पालक, बालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सांगता येत नाही आणि सहनही होत नाही.....



तुमचे प्रॉब्लेम लपवून ठेवू नका त्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन घ्या फोनवर आणि घरीबसून औषधी मिळवा.
■ ऑनलाईन औषधोपचार : आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज,
गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे.
सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.
Dr Shaikh A H - 98606 99906

## आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या युगात भारताची वाटचाल

ॲड.प्रा. कौशिक म. हरणे. मो.- 96731 75197





कालच्या भागावरून पुढे.....
अशा परिस्थितीत भारताने केवळ तंत्रज्ञानाचा ग्राहक बनून राहता कामा नये. भारताने स्वतःची आर्टिफिशियल इंटेलिजन्स मॉडेल्स, स्वतःची डिजिटल उत्पादने आणि जागतिक स्तरावर स्पर्धा करू शकतील अशा तंत्रज्ञान कंपन्या निर्माण करण्याचे ध्येय ठेवले पाहिजे 'मेड इन इंडिया' सोबतच 'डिझाइन्ड इन इंडिया' आणि 'इनोव्हेटेड इन इंडिया' ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्याची वेळ आली आहे.
भारतातील संशोधन संस्था, आयआयटी, आयआयएम, विद्यापीठे आणि उद्योगक्षेत्र यांनी एकत्रितपणे काम केल्यास जागतिक दर्जाचे संशोधन आणि नवकल्पना घडू शकतात. तसेच भारतीय वंशाचे अनेक तंत्रज्ञानतज्ज्ञ आज जगातील अग्रगण्य कंपन्यांमध्ये नेतृत्वाच्या भूमिकेत आहेत. त्यांच्या अनुभवाचा आणि ज्ञानाचा उपयोग देशातील नव्या पिढीला मार्गदर्शन करण्यासाठी केला जाऊ शकतो. आर्टिफिशियल इंटेलिजन्स ही केवळ आर्थिक विकासाची संधी नाही, तर राष्ट्रीय सुरक्षेचा, सामाजिक परिवर्तनाचा आणि जागतिक प्रभाव वाढविण्याचाही महत्त्वाचा मार्ग आहे. ज्या राष्ट्रांकडे आर्टिफिशियल इंटेलिजन्स तंत्रज्ञानाचे नेतृत्व असेल, ती राष्ट्रे भविष्यातील जागतिक व्यवस्था घडवतील. भारताकडे आवश्यक प्रतिभा, लोकसंख्या, बाजारपेठ आणि क्षमता आहे. गरज आहे ती केवळ दूरदृष्टी, धाडसी निर्णय आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांची.
जर भारताने पुढील दहा वर्षांत आर्टिफिशियल इंटेलिजन्स क्षेत्रात व्यापक गुंतवणूक, संशोधन आणि नवउद्योजकतेला प्रोत्साहन दिले, तर २१ वे शतक हे केवळ भारताच्या आर्थिक प्रगतीचे नव्हे, तर भारताच्या तांत्रिक नेतृत्वाचेही शतक ठरू शकते.
क्रमश:..... पुढील भाग उद्याच्या अंकात

## एसटीच्या इतिहासातील एक अनोखा अध्याय दुमजली ट्रेलर बस (१९६७)



आजच्या आधुनिक बससेवेच्या युगात अनेकांना कदाचित माहिती नसेल की, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (एसटी) १९६७ साली एक अत्यंत आगळीवेगळी दुमजली ट्रेलर बस रस्त्यावर आणली होती.
पुण्यातील दापोडी कार्यशाळेत या विशेष बसची निर्मिती करण्यात आली होती. या बसची रचना त्या काळासाठी अतिशय नाविन्यपूर्ण होती. बसचा पुढील भाग (ट्रॅक्टर) लेलँड कंपनीचा होता, तर मागील दुमजली प्रवासी भाग (ट्रेलर) महिंद्रा कंपनीने तयार केला होता.
या बसची आसनक्षमता तब्बल १०७ प्रवासी इतकी होती. त्यामुळे एका फेरीत मोठ्या संख्येने प्रवाशांची वाहतूक करणे शक्य होत होते.
ही ऐतिहासिक बस नाशिक ते नाशिक रोड रेल्वे स्टेशन या मार्गावर धावत असे. आपल्या अनोख्या रचनेमुळे आणि प्रचंड प्रवासी क्षमतेमुळे ती त्या काळातील आकर्षणाचा केंद्रबिंदू बनली होती.
अभियांत्रिकी कौशल्य, नावीन्यपूर्ण विचार आणि प्रवासी सेवेची बांधिलकी यांचे हे एक उत्कृष्ट उदाहरण मानले जाते. आजही ही बस महाराष्ट्र एसटीच्या गौरवशाली इतिहासातील एक दुर्मिळ आणि अभिमानास्पद अध्याय म्हणून ओळखली जाते.
🚍 एसटीचा वारसा, महाराष्ट्राचा अभिमान!
तुम्हाला या दुमजली ट्रेलर बसबद्दल आधी माहिती होती का? कमेंटमध्ये नक्की सांगा! 👇
#MSRTC #STMahamandal #MaharashtraST #TransportHistory #DoubleDeckerBus #VintageBus #Nashik #Maharashtra #TravelDuniya #STHistory #PublicTransport #मराठी #एसटी #महाराष्ट्र_एसटी 🚍

## सहावीतील हफीज पटेलनी बनविला सौरऊर्जेवरील पंखा



सुधीर कोर्टीकर

### टाकाऊ पासून पंखा बनवणाऱ्या बालवैज्ञानिकाचे सर्वत्र कौतुक

जालना जिल्ह्यातील बदनापूर तालुक्याच्या बाजार वाहेगाव मधील इयत्ता सहावी शिकणारा हाफिज पटेल यांनी सौर ऊर्जेवर चालणारा हा पंखा तयार करून सर्वांचे लक्ष आपणाकडे वेधून घेतलेले आहे. बाजार वाहेगाव मध्ये सतत वीजपुरवठा खंडित होत असल्यामुळे आपल्या आई वडिलांना घरामध्ये उकाड्याचा .. उष्णतेचा खूप त्रास सहन करावा लागत आहे ही गोष्ट या शालेय मुलांनी जाणली . आपल्या वडिलांच्या शेतामधील निरुपयोगी टाकाऊ साहित्याचा वापर करून त्यांनी सौरऊर्जेवर चालणारा हा पंखा तयार केला.
हफीजनी यापूर्वी बॅटरीवर चालणारी डीसी कार , बॅटरीवर चालणारे छोटे कूलर ,छोटे मिक्सर , तसेच शेतातील गवत काढावयाचे बॅटरीवर चालणारे छोटे कटर देखील त्याने अशाच टाकाऊ साहित्यापासून निर्माण केलेले आहे. अतिशय गरीब शेतकरी कुटुंबातील असणाऱ्या हॉफिसनी आपल्या आई-वडिलांना शेतामध्ये होणारा त्रास याचा विचार करून




त्यांना मदत व्हावी म्हणून त्यांनी टाकाऊ उपकरणा पासून अशा पद्धतीची उपकरणे आतापर्यंत तयार केलेली आहेत.
हफीजला शालेय विज्ञान प्रदर्शनांमधून अशा प्रकारच्या विविध उपकरणांसाठी बक्षीस देऊन गौरविण्यात आलेले आहे. हाफिजच्या या नावीन्यपूर्ण उपक्रमांमधून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना विज्ञान विषयक आवड निर्माण होईल त्याच बरोबर तसेच संशोधनाची भावना देखील त्या विद्यार्थ्यांच्या मनामध्ये वाढीस लागेल ही भावना बाजार वाहेगाव मधील ग्रामीण भागातील शेतकऱ्यांनी व्यक्त केली. त्यामुळेच बाजार वाहेगाव मधील सर्व स्तरातील लोकांकडून हाफीज पटेलचे मनापासून कौतुक केले जात आहे.

# शाळा सुरु करायचीय; संभ्रम कायम

ज्योतिर्मय साहित्य

(मागील अंकावरून)



शाळा पंधरा जुनला सुरु कराव्यात. असं शासनाचं मत. का सुरु कराव्यात? याचं उत्तर विद्यार्थी शिकला पाहिजे. खरंच वर्षभर शाळेत येवून जे विद्यार्थी सर्वकष ज्ञान प्राप्त करीत नाही. तेच विद्यार्थी उच्चतम तापमानात शाळेत येवून खरे ब्रीद शिकू शकतील काय? यावर विचार करण्याची गरज आहे. त्यातच काही खाजगी महाभाग अर्थातच कॉन्व्हेंटवाले वा खाजगी शिकवणी वर्गवाले असे आहेत की जे विद्यार्थ्यांच्या जीवनाशी खेळत भर उन्हाळ्यातही शाळा ठेवतात व पालक आपल्या मुलांना त्या शाळेत वा खाजगी शिकवणी वर्गात पाठवतातच. हेच शासनाच्या लक्षात आलं व शासनही तोच प्रताप करायला पाहतो. परंतु याबाबत विशेष सांगायचं झाल्यास ज्या खाजगी शिकवणी देणाऱ्या संस्था वा शाळा वा शिकवणी वर्ग. ज्या वर्षभर विद्यार्थ्यांना शाळेत बोलावतात. त्या संस्थेत वा शिकवणी वर्गात ज्या पायाभूत सुविधा असतात. त्या अतिशय उत्कृष्ट दर्जाच्या असतात. अर्थातच प्रत्येक वर्गखोलीत एसी लागलेला असतो. कुलरची तरी व्यवस्था असते आणि त्या व्यवस्था या विद्यार्थ्यांकडून येणाऱ्या शिकवणी शुल्कातूनच केलेल्या असतात. परंतु शाळेचा आणि सरकारी शाळेचा विचार केल्यास ज्या शाळेत बरोबर शौचालयाच्या सुविधा नाहीत. तिथे पंखे, कुलर वा एसीचा विचार कसा करता येईल बरं? साधे पंखे सुद्धा बऱ्याच शाळेत नाहीत. तिथं कुलर वा एसीचा विचार न केलेला बरा. अशी शाळेची अवस्था. त्यातच बऱ्याचशा संख्येनं जास्त शाळा. अशा अवस्थेत शाळेत विद्यार्थ्यांना पंधरा जुनला पाठवताच विद्यार्थ्यांचे हाल कसे होतील. याबाबत विचार न केलेला बरा. थोडा थंडावा आल्यास व शाळा सुरु केल्यास बरं नाही का? परंतु शासन ऐकेल तेव्हा ना. यासाठीच दरवर्षी लोकांना न्यायालयात जावं लागतं. राहिला वेतनाचा प्रसंग. जे शिक्षकांचे वाढलेले वेतन शासनाच्या मनात खलतं. ज्यातून उन्हाळ्यात सुद्धा फुकटचं शिक्षकांना वेतन द्यावं लागतं असं सरकारला वाटतं. ज्यातून शिक्षकांची गाळणी करण्यासाठी टि ई टी आणली. ज्या टि ई टी परीक्षेतील प्रश्नांचा व शिक्षकांच्या अनुभवाचा दूरदूरचा संबंध नाही.

संभ्रम........ शाळेचा शेवटचा वर्कींग दिवस ठरवतांना संभ्रम. त्यातच शाळा नेमक्या केव्हा सुरु कराव्यात याबाबत संभ्रम. ज्यात एक निश्चित तारीख असावीच. जशी पुर्वी नेमकी तारीख होती, सव्वीस जुन. परंतु आता नेमकी शाळा केव्हा सुरु करायची. हे कळत नाही. ज्यात दरवर्षी संभ्रमच असतो शासनाच्या मनात. दरवर्षीच तारखा बदलत असतात आणि सव्वीस जुनच्या नंतरच शाळा सुरु होत असतात. विदर्भात तर असंच घडतं. शाळा निश्चितच सव्वीस जुनच्या नंतरच सुरु होत असतात. असं असतांना शाळेच्या तारखेबाबत संभ्रम का पडावा दरवर्षी? दरवर्षीच न्यायालयात का जावं लागावं लोकांना शाळा सुरु करण्याच्या तारखेचं निश्चीतीकरण करण्यासाठी? एक नेमकी तारीख का नसावी? वैगेरे प्रश्न अनिश्चित आहेत. कधी शासन जे पेपर घेतं. त्या पेपरची तारीख बदलवली जाते तर कधी सुट्टीच्या तारखेबाबत घोळ असतो. कधी शासन जे जी आर काढतात. तेही बदलवावे लागतात. असं का होतं? इथं शाळा लवकर सुरु करीत असतांना जे शिक्षकांना उन्हाळ्यात देय असलेले वाढीव वेतन खलतात शासनाला. त्याच धर्तीवर सांगावेसे वाटते की त्यांच्या मनात त्यांचेच वाढलेले वेतन का खलत नाही? आमदार, खासदार व मंत्रीमंडळांचे वाढलेले वेतन का खलत नाही? तसेच एसीच्या कमऱ्यात बसून अक्कल सांगणाऱ्या व सर्वतोपरी विषयांकीत निर्णय घेणाऱ्या शासनानं जरा शिक्षकी व विद्यार्थी जीवनात येवून बघावं आणि त्यांना पंधरा जुनला शाळा सुरु झाल्यावर होणारा त्रास अनुभवावा म्हणजे कळेल, त्यांची अवस्था. विना पंख्यानं वर्गखोलीत शिकायला बसतांना कोणता त्रास होतोय ते. काही आदिवासी भाग असेही आहेत की त्या भागात आजही शाळेसाठी प्रशस्त इमारत नाही.




पायाभूत सुविधांची गोष्टच वेगळी. वर टिनाचे शेड आहेत वा कवेलूच्या शाळा. आजुबाजूला झाडं जरी असली तरी त्यांची हवा ही परीसरातील उष्णता शरीराला पोषक असलेल्या पाहिजे त्या प्रमाणात शोषून घेत नाही. उरला प्रश्न शहरी भागातील तर शहरी भागात जे सिमेंटचं बांधकाम झालं. त्यानं जी उष्णता वाढली. ती उष्णता एसी लावला तरी कमी करता येत नाही आणि एसी लावलाही. तरी त्यातून जेव्हा मनुष्य सरळ बाहेर उन्हात येतो. तेव्हा आपली प्रकृती बिघडल्याशिवाय राहात नाही. याचाच अर्थ असा की पंधरा जुनला शाळा सुरु करणे म्हणजेच विद्यार्थ्यांच्या जीवनाशी खेळणेच होय. असे म्हटल्यास आतिशयोक्ती होणार नाही. महत्वपुर्ण बाब ही लक्षात घेण्यासारखी आहे. ती म्हणजे शासनानं दरवर्षी अशी तारख बदलविण्यापेक्षा पुर्वीसारखीच शाळा सुरु करण्याची एक निश्चित तारीख करावी. ते विद्यार्थी हिताच्या दृष्टीकोनातून करावं. ते महत्वाचं. विद्यार्थी हित शासन पाहात असेल तर...... उर आ शिक्षकांचा प्रश्न तर शासन दरवर्षीच काही ना काही प्रकारानं शिक्षकांना उन्हाळ्याच्या सुट्टीतही राबवीत असतं. कधी बी एल ओचं काम देवून. कधी एखादं प्रशिक्षण लावून तर कधी एखादी कोणत्याही स्वरुपाची ड्युटी लावून. जशी यावर्षी भर तीव्र उन्हाळ्यात जनगणनेची ड्युटी लावली. जशी कोरोनातही भर उन्हाळ्यातच चुंगी नाक्यावर येणाऱ्या वाहनातील कोरोनायुक्त रुग्णांना तपासायची ड्युटी लावली होती. त्या ड्युट्या शिक्षक करतातच, शासनाचं काम आहे हे समजून. आपला जीव धोक्यात घालून. ज्यात त्यांचा जीवही जात असतो. जसे कोरोनात काही शिक्षक मरण पावले. जसे यावेळेस जनगणनेतही काही शिक्षक उन्हाळ्याचा त्रास सहन न झाल्यानं मरण पावले. महत्वाचं सांगायचं झाल्यास शासन शिक्षकांचा विचार न करता पंधरा जुनला शाळा सुरु करु पाहात होते. ती तारीख बावीस झालेली असून तिही तारीख पुढे बदलू शकते. त्यामुळंच अशा भानगडी करण्यापेक्षा शासनानं जी निर्धारीत शाळा सुरु करण्याची तारीख सव्वीस जुन निश्चित केली आहे. तीच ठेवल्यास काहीच समस्या उद्भवत नाही. उद्भवू शकत नाही. राहिला शिक्षकांचा प्रश्न तर सरकारी शाळेतील ग्रामीण भागातील शिक्षक आणि खाजगी अनुदानीत शाळेतील शिक्षकही शासनाचं उन्हाळ्यात वेतन मिळत नसतांनाही ढर उन्हाळ्यातच नाही तर वर्षभर शाळेत जातात. शाळा प्रवेशाचं उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी नव्हे तर अलिकडील काळात कॉन्व्हेंटच्या वाढत्या प्रस्थांमुळे शासनाच्या सरकारी, अनुदानीत शाळेत विद्यार्थी मिळत नाही. परंतु शाळा टिकायला हव्यात. विद्यार्थी यायलाच हवेत. विद्यार्थी आहेत तर आपण आहोत. या भावनेनं भावनेनं. खरं तर हीच गोष्ट वाखाणण्याजोगी आहे. परंतु ही गोष्ट पदड्याआड घडत असल्यानं एखाद्या चित्रपटासारखी गोष्ट शिक्षकांच्याही जीवनात घडते. चित्रपटात नायक समोर असल्यानं लोकांच्या लक्षात तोच राहतो. परंतु त्या नायकाला उभं करण्यासाठी जो व्यक्ती दिग्दर्शक व निर्माता रुपात पदड्याआड असतो. खरं तर त्याच्याचमुळं चित्रपट दर्जेदार बनतो व पाहायला हवाहवासा वाटतो. अगदी तसंच शिक्षकांचही जीवन आहे. शासन नायक आहे व शिक्षक पदड्याआडचा दिग्दर्शक आणि निर्माता. ज्यातून तो काहीच करीत नाही. हे इतर लोकांना वाटतं. परंतु लोकं चित्रपटासारखं नेमकं तेच विसरतात की तोच खरा कलाकार आहे की जो विद्यार्थ्यांच्या जीवनात रंगत आणतो. शासन रुपातील एसीच्या कमऱ्यात बसून निर्णय घेणारे नायक विद्यार्थी जीवनातील चित्रपटाला रंगत आणत नाहीत.

# माझे देशाटन

ज्योतिर्मय साहित्य

उत्तरेतील हिमालयाच्या बर्फाछादित शिखरांपासून ते दक्षिणेतील अथांग अशा हिंद महासागरा पर्यंत पसरलेला आणि विविधतेने नटलेला आपला महान भारत देश प्रत्येकाला नक्कीच अभिमान वाटावा असा आहे.

आपल्यापैकी प्रत्येक जण कुठल्या ना कुठल्या निमित्ताने देशांतर्गत प्रवास करत असतो आणि आपल्या महान भारतभूमीचे, येथील विविधतेने नटलेल्या परंपरा, निसर्ग सौंदर्य, संस्कृती, भाषा, खानपान, पोशाख, यांची ओळख करून घेत असतो. या प्रवासात आपण देशाविषयी माहितीने अधिक समृद्ध होत असतो. आपला देश समजून घेण्यासाठी आपण सर्वांनी विविध ठिकाणी गेल पाहिजे, तीर्थाटन आणि पर्यटन नक्कीच केल पाहिजे.

मराठवाड्याच्या एका खेडे गावातून आलेला मी आयुष्यात एवढा प्रवास करेल असे मला कधीच वाटले नव्हते. लहानपणी औरंगाबाद शहर पाहणे ही सुद्धा मोठी पर्वणीच वाटत होती. तेथील पाणचक्की, बिबिका मकबरा, अजिंठा, वेरूळ लेणी, दौलताबाद किल्ला हे प्रसिद्ध असलेले पर्यटन स्थळ पाहण्याची संधी मिळणे म्हणजे नशीबच असे वाटे.

मला संभाजीनगरच्या सरस्वती भुवन शाळेतून दहावी, एस बी सायन्स कॉलेज मध्ये अकरावी आणि पुढे मेकॅनिकल इंजिनियरिंग डिप्लोमा शिक्षण येथील गव्हर्नमेंट पॉलिटेक्निक मधून घेता आले. फोर्ब्स कंपनी मध्ये पहिली नोकरी देखील येथेच मिळाली त्यामुळे संभाजीनगर म्हणजेच औरंगाबादची ओळख सुरवातीच्या विद्यार्थी काळातच झाली.

माझी शासकीय नोकरीची सुरुवात १९८५ साली प्रथम नांदेड जिल्ह्यातील धर्माबाद या महाराष्ट्राच्या शेवटच्या गावापासून झाली. तेथील आयटीआय मध्ये निदेशक म्हणून मी रुजू झालो. येथून आंध्रप्रदेश बॉर्डर केवळ दोन किलोमीटर अंतरावर आहे. बहुतांश लोक तेलगू आणि मराठी दोन्ही भाषा बोलणारे होते. धर्माबाद हे शैक्षणीक आणि सांस्कृतिक दृष्ट्या तसे प्रगत गाव होते. लाल बहादूर शास्त्री महाविद्यालय, डी एड कॉलेज, आय टी आय, हुतात्मा पानसरे हायस्कूल या संस्था मुळे शैक्षणीक वातावरण चांगले होते. तेथील व्यापारपेठ देखील मोठी होती.

धर्माबाद येथून बदलीने १९८९ मधे मी परभणी येथे आलो. परभणी म्हणजे पूर्वीचे प्रभावतीनगरी हे माझे जिल्ह्याचे ठिकाण पण औद्योगिक विकासा पासून दूर असलेलं. बाल विद्या मंदिर, नूतन विद्या मंदिर अशा चांगल्या शाळा, शिवाजी महाविद्यालय, ज्ञानोपासक महाविद्यालय, आयटीआय, बी एड कॉलेज, मराठवाडा कृषी विद्यापीठ व त्या अंतर्गतची विविध महाविद्यालये, यामुळे शैक्षणीक दृष्टीने विकसित असे हे परभणी शहर होते. साहित्य, संगीत आणि मराठवाडी सांस्कृतिक वारसा जपणार शहर. येथे मी १९९६ पर्यन्त काम केले

शासकीय नोकरीत प्रशिक्षण अधिकारी अर्थात ट्रेनिंग ऑफिसर म्हणून माझी निवड झाली आणि १९९६ साली मी पुण्यात औंध येथे आलो. एप्रिल २००१ मध्ये माझी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने निवड केली आणि मी प्राचार्य पदावर रुजू झालो. मग पुढे सेवानिवृत्ती पर्यन्त पुणे विभागातच विविध ठिकाणी विविध पदावर काम करण्याची संधी मला मिळाली.




कार्यालयीन प्रवास

महाराष्ट्रातील मुंबई, ठाणे, नागपूर, नाशिक, कोल्हापूर, रत्नागिरी, सातारा, सोलापूर या आणि इतर शहरांच्या ठिकाणी शासकीय बैठका निमीत्त जाणे झाले आणि ही शहरे पाहण्यात आली.

पंजाब मधील लुधियाना येथे १९९८ मध्ये महाराष्ट्राबाहेर ट्रेनिंग निमित्त जाण्याचा योग आला. एक महिना केंद्र शासनाच्या प्रगत प्रशिक्षण संस्था () लुधियाना येथे असताना शनिवार व रविवार सुट्टीत जवळचे अमृतसर येथील सुवर्ण मंदिर, ऐतिहासिक जालियनवाला बाग, भारत पाक वाघा बॉर्डर वरील सीमा सुरक्षा दलाच्या जवानांचे नेत्रदीपक असे संचलन इत्यादी बघता आले.

हरियाणा चंदिगढ येथील रॉक गार्डन, जम्मू काश्मीर मधील वैष्णोदेवी मंदीर, हिमाचल प्रदेश मधील शिमला या ठिकाणी जाता आले आणि तेथील स्थळे बघण्यात आली. दिल्ली मधील लाल किल्ला, कुतुब मिनार, लोटस टेम्पल, अक्षरधाम मंदिर, संसद भवन हे सर्व प्रसिद्ध ठिकाणे बघता आले.

कर्नाटक मधील बेंगलोर येथील भारत सरकारच्या अपेक्स हायटेक इन्स्टिट्यूट ट्रेनिंगला गेलो त्यावेळी प्रसिद्ध वृंदावन गार्डन, म्हैसूरचा महाराजा पॅलेस आणि बेंगलोर शहर पाहिले. या सर्व ठिकाणी ऑफीस मधील सहकारी मित्र सोबत होते.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगा मार्फत आयटीआय प्राचार्य म्हणून माझी निवड झाली आणि कामाचे स्वरूप प्रशासकीय झाले. आम्ही नियुक्त झालेले नवीन अधिकारी प्रशासकीय प्रशिक्षण निमित्त पश्चिम बंगाल मध्ये कलकत्ता येथील सेंट्रल स्टाफ ट्रेनिंग अँड रिसर्च इन्स्टिट्यूट () येथे गेलो. सोमवार ते शुक्रवार विविध वक्त्यांचे व्याख्याने असत त्यावेळी शनिवार रविवार सुट्टीत तेथील सायन्स सिटी, व्हिक्टोरिया मेमोरियल,बेलूर मठ, कालीमाता मंदिर , दक्षिणेश्वर मंदिर बघितले तसेच तेथील ट्राम मधे बसलो आणि मेट्रो प्रवासाचा अनुभव घेतला. तेथून जवळ असलेल्या दार्जिलिंग, तसेच गंगासागर येथेही जाऊन आलो. कलकत्ता येथे वेगवेगळ्या निमित्ताने जाण्याचा त्यानंतरही चार ते पाच वेळा योग आला.

जागतिक बँक प्रकल्प बैठकी निमित्त गुजरात मध्ये अहमदाबाद येथे गेलो त्यावेळी तेथील अक्षरधाम मंदीर, साबरमती आश्रम आणि अन्य ठिकाणे पाहिली. राष्ट्रीय कौशल्य स्पर्धेसाठी स्पेशल एस्कॉर्ट ऑफिसर म्हणून महाराष्ट्राचे निवडलेले विद्यार्थी घेऊन उत्तरप्रदेश कानपूर येथिल केंद्र शासनाच्या प्रगत प्रशिक्षण संस्था () येथे जाण्याचा योग आला त्यावेळी बिठूर येथील नानासाहेब पेशव्यांची समाधी पहायला आवर्जून गेलो होतो.

**(क्रमशः)**

# भुर्र उडालेली ती चिमणी...!

ज्योतिर्मय साहित्य

(मागील अंकावरून)

‘‘खर तर रागवलेच होते ग तुझ्यावर!‘‘ ‘‘आणि काय हे..?‘‘

ही बैलगाडी हे झोक्यातल बाळ, बाजूला असलेले तांबूस भूर्या केस आणि अर्धवट कपड्यातल हे बाळ, ह्या रापलेल्या बांगड्या, आणि त्याचा तो बुळंबुळीत आवाज.. काळजी म्हणावी की..? ममत्व ‘‘

‘‘पण ह्या सर्वातली ती कुठे गेली गं ?‘‘

‘‘शिंदे मॅडमला, मी मॅडम होणार म्हणणारी.‘‘

‘‘काय माहित?‘‘

‘‘कुठेतरी हरवली बहुतेक !‘‘

..का? काय? कुठे? कसे? सारं सारं कसं अगदी चिमणी सुद्धा निःशब्द पण... काहीतरी होते म्हणूनच की काय! नेमक्या तेवढ्याच वेळात दूरवरच्या ओढ्यातून येणारा तो कु कु कोकिळेचा तो कर्णमधुर आवाज तिच्या कानाजवळ घुमू लागला. नकळत तोंडून शब्द बाहेर पडले, पक्षांची शाळा...

कल्पनेतलं ते हरीण कधी कधी कधी किती सुसाट सुटतं ना!

त्या जळत्या वेळी चुरगळलेल्या पाचटीची त्याच दिवशी कडूशाला राख झाली होती, पण त्याच धुमसणाऱ्या राखेखाली एका ठिकाणी खोडव्याला फुटलेला गारासलेला तो अंकुर नव्या पालवीतून फुटू पहात होता.

साखर शाळा चालतात, किंवा नाही. त्यामागची कारणे अडचणी असतील नसतील, आणि असं बरचसं खूप काही त्यावरुन मनाची झालेली घालमेलं. समस्या चे समाधान कि समाधानाची समस्या ?

हि वाट किती दूर जाते काय माहित? समाधान होईपर्यंत

काही न करता झालेली ती सुरुवात त्यादिवशी खूप काही करून गेली.

कुठल्याशा त्या हळव्या कोपऱ्यात तेव्हा तिला



काहितरी जाणवले की काय ...!

काय माहित खूप गाठी बसलेल्या त्या जाळ्याची एक एक गाठ सोडवता सोडवता प्रयत्नाने.. कदाचित साऱ्या गाठी सुटून झालेला गुंता सुटून कदाचित संपूर्ण जाळे मोकळे होऊ शकते...

सर्रकन वेळ सरकावी, आणि पहिल्या ठिपक्यापासून सुरु झालेली रांगोळी पुन्हा त्याच ठिपक्या भोवती यावी ...!

त्या जळत्या उन्हातला तो संवाद, पुन्हा एकदा नकळत...

शुल्लक कारणासाठी हळवी होणारी तू तू राहिली नाहीस.

तू तू कोणीतरी वेगळी होणार होतीस ना?

आठवतेय का चिमणी तुला, तुझ्या गावी असताना वर्गात तुला शिंदे बाईंनी तुम्ही कोण कोण होणार असा प्रश्न विचारला होता.

तेव्हा तू काय म्हणाली होतीस.

‘‘मी मॅडम होणार.‘‘

आणि त्याच्यानंतर काही दिवसानंतरच तुला आईबाबा बरोबर इकडे यायचे होते.

तेव्हाही तू किती रडली होतीस. तुला शाळा सोडून यायचे नव्हते तेव्हा.

आणि त्याच्यानंतर हे मागच्या एक दोन वर्षात काय गं !

हे हे चार पाच महिन्याचे हे बाळ, हे दुसरे एक दीड वर्षाचे बाळ हे काय आहे ग!

तू कोणीतरी वेगळी होतीस आणि आजही आहेस.

‘‘चिमणी‘‘

‘‘अम्‘‘

‘‘हो‘‘

मनमोकळे पणाच्या वेलीला लागलेली संवादाची कळी दडपणातून हळूवार उमलू लागली.

‘‘पण मी तरी काय करू ग!‘‘

‘‘माझ्याकडे दुसरा मार्ग नाही ग.‘‘

‘‘का? का मार्ग नाही. मार्ग आहे.‘‘ तो शोधला तर सापडेल.

हे छोटे बाळ सांभाळायला लागते. ते दुसर बाळाला खाऊ वगैरे असे कितीतरी प्रश्न, आणि मग त्याच्या उत्तराच्या बदल्यात मिळालेली काही अपेक्षित तर काही अनपेक्षित उत्तरे,

तुला हे सगळ सोडून दे असं म्हणतच नाही जबाबदारीची जाणीव आहेच ग!

‘‘पण ‘‘ तरीही

तू वेगळी आहेस हे कायम लक्षात ठेव,

तू काहीतरी प्रयत्न तर करून बघ.


आणि कधीही अगदी काळ्या रात्री सुद्धा कधीही मागे वळुन पाहिलेस ना तर कायम मी तुझ्यासोबत असणार आहे. एवढं लक्षात ठेव.

..आणि तेव्हाच अचानक समोरच्या रस्त्यावर पांढरी शुभ्र गाडी अचानक थांबली काय.

बिघडलेली ती गाडी तिने लहान मूल सोबत असताना ही प्रयत्नाने दुरुस्त केली काय. त्या दोन टारगट मुलांना स्वतःच्या चतुराईने बोलती बंद करून स्वाभिमान धाडसानेआणि प्रयत्नाने सगळे शक्य असते, आणि त्यातून जगण्याचा एक नवा अनुभव देवून गेली.

प्रत्येकाच्यात काहीतरी वेगळे असतेच ग.

तो प्रसंग घडताना चिमणीच्या हाताच्या घट्ट मुठी त्याचे प्रतीक होत्या. गाडीतल्या त्या बाईने त्या दोन मुलांची चतुराईने पॅम्म चर झालेली गाडी तिच्या अंगावर असलेली ती सफेद साडी आणि त्यावर




असलेला तो काळा कोट तिच्यात नवी उमेद भरून गेली. आणि ते एक वाक्य माझी मदत करण्यापेक्षा तुम्हाला कोण मदत करते का ते आधी पहा.

नाहीतर या आड रानात तुमची काय हालत होईल, या एका वाक्यातून नी कृतीतून चिमणीच्या आतली कमकुवत चिमणी केव्हा भुर्र..झाली ते तिचे तिला सुद्धा कळले नाही.

त्या बाई सहज बोलता बोलता गाडीत बसून एखादा पक्षी भुर्रकन उडून जावा, तशी निघून गेली. आणि ती मुले....

पश्चिमेच्या क्षितिजाकडे चाललेला तो तळपता सूर्य स्वतःचे मार्गक्रमण करत पुढे चालला होता.

‘‘किती छान!‘‘

म्हणजे आपणही हे करूच शकतो. कोणतीच गोष्ट अवघड नाही.

‘‘पाहिलेस चिमणी‘‘

‘‘आज स्त्रिया मुली कुठे पोहचल्यात ते.‘‘

बोलण्या बोलण्यातून जाणवलेला तो आशेचा एक किरण..

‘‘किती चांगलं मी ही हे करणारच.. ‘‘ मॅडम मी होणारच‘‘ नकळत तोंडून शब्द बाहेर पडले.

‘‘जमेल तुला!‘‘

‘‘तू करून तर बघ जमेल तुला!‘‘ ‘‘जमेलच ग!‘‘

‘‘पण?‘‘ म्हणता म्हणता

‘‘ठीक आहे.‘‘

म्हणून

चिमणीआजूबाजूला पाहू लागली.पण?...पण एका दिशेला तिला दिसली फक्त दूरवर उडालेली ती पाठमोरी चिमणी!

पाऊस आल्यावर एखाद्या गरुडाने उंच आकाशात झेप घ्यावी, तशी चिमणीच्या मनाने उंच झेप घेतलीआणि...

ध्येयासक्ती ने पछाडलेल्या मनाला कुठे भान असते.आणि त्याला इच्छा शक्तीची जोड मिळण्याचाच फक्त अवकाश. कुठून काय म्हणजे इच्छा तिथे मार्ग असेच काहीसे व्हावे.आणि मग..?किती तरी अडचणी असताना ना शाळा ना वही ना पुस्तके पण...

**(क्रमशः)**

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी–चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559